## प्रेसनोट दि. १६/१२/२०१७

## सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखा पुणे शहर यांचे कडुन पंचतारांकित हॅाटेल वर छापा कारवाईद्वारे १ परदेशी व १ भारतीय महिलांची हायप्रोफाईल वेश्याव्यवसायातुन सुटका

दि. १५/१२/२०१७ रोजी पोलीस नाईक नितीन तेलंगे सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे यांना मिळालेल्या माहीती नुसार कोरेगावपार्क परिसरातील एका पंचतारांकित हॅाटेल मध्ये देशातील व परदेशातील मुलींना पैशाचे अमिष दाखवून अवैध वेश्याव्यवसाय करवुन घेत असल्याची माहीती मिळाले वरुन, गुन्हे शाखेच्या पथकाकडुन पडताळणीद्वारे छापा कारवाई करण्यात आली.

इसम नामे रोहित हा आपले साथीदार एजंटसच्या मदतीने वेगवेळया ठिकाणच्या मुली वेश्याव्यवसायासाठी मिळवुन वेगवेगळ्या हॅाटेल मध्ये त्यांचे नावे रुम बुक करुन त्यांना तेथे ठेवुन, वेश्यागमनासाठीच्या ग्राहकांबरोबर मोबाईल फोनच्या माध्यमातुन संपर्क साधुन, वेश्यागमनासाठीची रक्कम ठरवुन ग्राहकांना नमुद हॅाटेल रुम्समध्ये पाठवुन मुलींकडुन वेश्याव्यवसाय करवुन घेत असले बाबत मिळालेल्या माहीती वरुन अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष गुन्हे शाखा पुणे शहरचे पोलीस निरीक्षक श्री. संजय पाटील व सामाजिक सुरक्षा विभागाकडील अधिकारी, कर्मचारी तसेच कोरेगावपार्क पोलीस स्टेशनकडील अधिकारी व कर्मचारी यांनी संयुक्त कारवाई करुन कोरेगावपार्क परिसरातील पंचतारांकित हॅाटेलमध्ये चालत असलेल्या हायप्रोफाईल वेश्याव्यवसाया बाबत खातरजमा करुन तेथे छापा टाकला. छाप्या दरम्यान १ नेपाळ देशाची व १ भारतीय मुलगी अशा एकुण दोन सज्ञान पिडीत मुलींची वेश्याव्यवसायातुन सुटका करुन आरोपीत इसमनामे १) सुमन ऊर्फ राज २) कुमार ३) रोहित या एजंट विरुध्द कोरेगावपार्क पो.स्टे. २०१/२०१७ अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध अधिनियम. १९५६ कलम ३,४,५ सह भा.दं.वि.क. ३७०, ३७० अ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्यातील पिडीत मुलींना रेस्क्यु होम, महमंदवाडी, हडपसर येथे संरक्षणकामी ठेवण्यात आले आहे.

वरील नमुद कारवाई ही मा.श्री.प्रदिप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, मा.श्री.पंकज डहाणे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे पुणे, मा.श्री.संजय निकम, सपोआ, गुन्हे-२, यांचे मार्गदर्शनाखाली पोनि श्री.संजय पाटील, सपोनि चंद्रकांत जाधव, मसपोनि शितल भालेकर, नितिन तेलंगे, नितिन लोंढे, सचिन कदम, रमेश लोहकरे, ननिता येळे, राजेंद्र कचरे, संदीप गायकवाड, सचिन शिंदे, संदीप गि-हे, अनुराधा ठेंबरे, रुपाली चांदगुडे, सरस्वती कागणे यांनी केली आहे.